# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ४ थे अंक २१६ वा रविवार दि.१६ फेब्रुवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## विमा देऊन सरकार शेतक-यांवर उपकार करते काय?

नागपूर : भाजप महायुतीचे सरकार हे शेतकरी विरोधी आहे, हे वारंवार उघड झाले आहे. शेतक-याला अतिरेकी, नक्षलवादी, आंदोलनजीवी म्हणून त्यांचा अपमान केला आणि आता राज्यातील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतक-यांना भिकारी म्हणून अकलेचे तारे तोडले आहेत. माणिकराव कोकाटे यांचे शेतक-यांबद्दलचे विधान सत्तेचा माज आल्याचे दर्शवते. शेतकरी भिकारी नाही तर शेतक-यांसह सर्वसामान्य जनतेला जीएसटीच्या माध्यमातून लुटणारे भाजपा महायुतीचे सरकारच भिकारी आहे, असा हल्लाबोल काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केला आहे.



कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या विधानाचा समाचार घेत नाना पटोले म्हणाले की, शेतकरी जगाचा पोशिंदा आहे त्याचा अपमान करणे ही विकृती आहे. भाजपा महायुती सरकार हे शेतकरी विरोध असून फक्त धनदांडग्यांसाठी काम करत आहे. सरकार १ रुपयात पीक विमा देते म्हणजे शेतक-यांवर उपकार करत नाही आणि हे पैसे माणिकराव कोकाटे त्यांच्या खिशातून देत नाहीत अशी टीका नाना पटोले यांनी केली.

सरकार शेतक-यांच्या शेतमालाला भाव देत नाही. कर्जमाफी देत नाही. निवडणुकीच्या काळात शेतक-यांना भरमसाठ आश्वासने देऊन भाजपा महायुतीने मतांची भीक मागितली. शेतक-यांना शेतीसाठी लागणा-या कृषी साहित्यावर १८ टक्के जीएसटी लावून सरकार शेतक-यांकडूनच भीक घेते आणि वरून शेतक-यांनाच भिकारी म्हणते, या शब्दांत नाना पटोले यांनी निशाणा साधला.

दरम्यान, शेतक-यांच्या नावावर विविध योजनांमध्ये कृषी मंत्रालय कशी मलई खाते याचा पर्दाफाश नुकताच आम्ही केला. पीक विमा योजनेतही भ्रष्टाचार झाल्याचे उघड झाले आहे. शेतक-यांचा अपमान करणा-या कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतक-यांची जाहीर माफी मागावी तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कृषीमंत्र्यांची हकालपट्टी करावी अशी मागणी नाना पटोले यांनी केली.

## नोबेल इंग्लिश प्री प्रायमरी स्कुल मध्ये विज्ञान प्रदर्शन मोठ्या उत्साहात संपन्न...





लातूर :- लातूर शहरातील सहारा कॉलोनी बरकत नगर येथील नोबेल इंग्लिश प्री प्रायमरी शाळेत विज्ञान प्रदर्शन ठेवण्यात आले होते. या प्रदर्शनास विध्यार्थ्यांचा व पालकांचा मोठा प्रतिसाद पाहावयास मिळाला. या प्रदर्शनास विध्यार्थ्यांनी विविध प्रोजेक्ट्स तयार केले जसे, चंद्रयान, डायस ऑफ वीक, वाइल्ड अनिमल्स, वॉटर टॉवर्स, सोलर सिस्टिम, कार इत्यादी.

प्रदर्शनास प्रमुख अथिती म्हणून रसूल कोकलगावे ( माजी उप प्राचार्य शिवाजी जुनिअर कॉलेज लातूर ) सरांनी विध्यार्थ्यांच्या करायचे खूप कौतुक केले तसेच संस्थेचे सचिव मुदससीर शेख सर व प्राचार्य श्रीमती उम्मेहानी मुदससीर शेख मॅडमच्या कामाची ही खूप प्रशंसा केली.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जन्म देणाऱ्या माता भीमाईचे कार्य समाजाने विसरता कामा नये - विजय वाठोरे

हिमायतनगर / प्रतिनिधी :- तालुक्यातील मौजे सरसम ( बु) येथे दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल पकार,महामानव,विश्वरत्न ,बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आई माता भिमाई रामजी आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे.




सर्वप्रथम माता भिमाई रामजी आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रमाई स्वयं सहायता बचत समूहाच्या अध्यक्षा कालींदा नारायण वाठोरे या होत्या. यावेळी पत्रकार विजय वाठोरे यांनी माता भिमाई यांच्या जीवनकार्याला उजाळा दिला. यावेळी ते म्हणाले कि पूर्वी शूद्र,अतिशूद्र म्हणून हिणवणाऱ्या समाजाला आज घडीला जे स्वातंत्र्य,समता, बंधुता आणि एवढे सुख सुविधा प्राप्त झाल्या आहेत त्या फक्त आणि फक्त भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच झाल्या आहेत आणि या थोर समाजसुधारकाला जन्म देणाऱ्या माता भिमाई यांच्यामुळेच आपल्याला हे सर्व मिळाले आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे पिता रामजी आंबेडकर व त्यांच्या परिवाराला सांभाळणाऱ्या तसेच लेकरा बाळांवर योग्य ते संस्कार करणाऱ्या माता भीमाईच होत्या. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मानंतर अवघ्या पाच वर्षातच त्यांचा मृत्यू झाला.त्यांनी त्यांचे जीवन आंबेडकर घराण्यासाठी अहोरात्र झिजविले.यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जन्म देणाऱ्या भीमाईचे कार्य समाजाने विसरता कामा नये.आजच्या माता माउल्यांनी ।

यावेळी या कार्यक्रमास रमाई स्वयंसहायता समूहाच्या सचिव रुपाली कांबळे, संघप्रिया कवडे, आम्रपाली नगराळे, माजी सरपंच शेषेकला नगराळे, बालाजी कांबळे, मायावती कांबळे, कमलबाई कांबळे,वंदना नगराळे,संजय वाठोरे, सरस्वताबाई कांबळे, प्रभावती कांबळे,राजू नगराळे, अमन नगराळे,दिशांत कांबळे,दक्ष कवडे यांच्यासह आदीजण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वसंत विद्यालय केज,इयत्ता१०वी बॅचचा निरोप समारंभ संपन्न

केज/प्रतिनिधी केज शहरातील वसंत विद्यालयाच्या इयत्ता१०वी बॅचचा निरोप समारंभ संपन्न झाला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन इयत्ता नववीच्या विद्यार्थी- विद्यार्थ्यांनी केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक तथा प्राचार्य पी. डी.धंडे तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते युवराज मगर, माजी मुख्याध्यापक आर. एल.राऊत,पर्यवेक्षक ए.डी. कोठावळे, ज्येष्ठ शिक्षक एस. आर. आगळे, पत्रकार मुबाशीर खतीब, पत्रकार तात्या गवळी, वाय.एम. जावळे,पी.ए.गाते,पी.पी.जाधव,ए.बी. थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वर्गीय लोकनेते बाबुरावजी आडसकर साहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी शाळेच्या व आयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे शाल, श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी इयत्ता दहावीतील विद्यार्थी व विद्यार्थिनी मनोगत व्यक्त करत सर्व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांना कस घडवल व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया कसा भरभक्कम करून त्यांची बोर्ड परीक्षेसाठी कशाप्रकारे तयारी करून घेतली यावर प्रकाश टाकत शेवटी विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचे आभार व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवर व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शक करून त्यांना पुढील भविष्यासाठी व परीक्षासाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप प्रसंगी मुख्याध्यापक धंडे सर बोलताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्वतःला कमी लेखू नये जिद्द,चिकाटी व मेहनत करण्यात कधीही कमी पडू नये




स्वर्गीय लोकनेते बाबुरावजी आडसकर साहेब यांनी केज शहरासह ग्रामीण भागातील बहुजनांच्या मुलांना शाळेत शिकता यावे व बहुजनांची मुले शिक्षणापासून वंचित राहून नाहीत म्हणून त्यांनी शाळा व महाविद्यालय उभारून बहुजनांच्या मुलांचा शिक्षणाचा मार्ग मोकळा केला आहे. पुढे रमेशरावजी आडसकर साहेब यांचे मार्गदर्शन व तत्यांची प्रेरणा घेऊन आम्ही सर्व शिक्षक वृंद मोठ्या जोमाने काम करत आहोत. पुढे बोलताना धंडे सर म्हणाले की, सर्व विद्यार्थ्यांचे माझ्या सर्व सहकाऱ्यांनी परीक्षेसाठी संपूर्ण वर्षभर पूर्ण पणे तयारी केलेले आहे तुम्ही सर्व विद्यार्थी मोठ्या मिरीटने पास होऊन शाळेचे नाव व तुमच्या आई-वडिलांचे नाव उज्वल कराल अशी त्यांनी विद्यार्थ्याकडून अपेक्षा व्यक्त केली. यावेळी वसंत विद्यालयाचे शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप हा शेवटी अल्पोपहारणे करण्यात आला.

## संत सेवालाल महाराज व पद्मभूषण नामदेव ढसाळ यांची जयंती साजरी.

लातूर :--- लातूर शहरातील नांदेड रोडवरील शिवरत्न जिवाजी महाले चौकात क्रांतीसिह संत सेवालाल महाराज व पद्मभूषण जेष्ठ मराठी कवी दलित चळवळीतील नेते नामदेव ढसाळ यांची आज शनिवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे महाराणा प्रताप ग्रामपंचायत सरपंच संगीता पतंगे , लातूर शहर महानगरपालिका माजी परिवहन सभापती मंगेश बिराजदार, लातूर शहर वाहतूक शाखा पीएसआय बाबुराव गीत्ते, उपसरपंच राजकुमार पवार, सदस्य सौ रत्नमाला घोडके, भाजपा नेत्या सौ निर्मलताई कांबळे, निर्मला आलापुरे, संजय आडे यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज व नामदेव ढसाळ यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण जय घोषणा देत विनम्र अभिवादन करण्यात आले. या वेळी



समिती अध्यक्ष दीपक गंगणे यांनी प्रस्ताविकात बोलताना क्रांतिसिंह संत सेवालाल यांची आज २८६ वी जयंती असून बंजारा समाजाचे धर्मगुरू म्हणून समाजात समाज प्रबोधनाचे मोठ्या प्रमाणात कार्य केल्याचे तसेच दलित साहित्य व चळवळीतील प्रमुख नेते नामदेव ढसाळ कवी, लेखक, वैचारिक स्वरूपात आपले स्वतःचे विचार प्रबोधनातून मांडणी केल्याने यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले असल्याचे सांगूण या महामानवाच्या आज जयंतीनिमित्त आम्ही सर्वजण जयंती साजरी करीत असल्याचे सांगितले.या वेळी प्रमुख पाहुणे मंगेश बिराजदार, संगीता पतंगे,राजकुमार पवार , बाबुराव गीते यांची अभिवादनपर भाषणे झाली या वेळी लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, बाबासाहेब बनसोडे, भगवेश्वर धनगर, सामाजिक कार्यकर्ते नितीन चालक,विनोद गंगणे, विनोद बूये, लड्या शेख ,गणेश घोडके, सुरेश संगापूडे, प्रदीप बेंबडे, नंदकिशोर गंगणे, धीरज कश्यपसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भगवेश्वर धनगर यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन बाबासाहेब बनसोडे यांनी मानले केले

## रोटरीच्या शैक्षणिक साहित्य उपक्रमाअंतर्गत शाहू विद्यामंदिरला टीव्ही संच भेट

केज/प्रतिनिधी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या पुढाकाराने, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर नॉमिनी जयेश पटेल यांच्या मेसर्स पी.पी.पटेल अँड कंपनी आणि रोटरी फौंडेशन च्या अर्थसह्याने व रोटरी क्लब ऑफ केजच्या उपक्रमांअंतर्गत केज शहरातील राजर्षी शाहू विद्यामंदिर शाळेला टीव्ही संच भेट देण्यात आला. शैक्षणिक साहित्यांतर्गत विद्यार्थ्यांना आकलन क्षमता वाढावी व शिक्षण अधिक सुलभ होऊन अभ्यासाची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने या टीव्ही संचाची अभ्यासक्रमाची डिझायनिंग करण्यात आली आहे. डिजिटल क्लासरूम च्या माध्यमातून गरजू शाळांना आपल्या अध्यापनाचा दर्जा उंचावण्यासाठी रोटरी ने हा उपक्रम हाती घेतला आहे. येत्या पाच वर्षात प्रतिवर्षी जिल्ह्यातील शंभर शाळांना अशा डिजिटल रुम तयार करण्यासाठी रोटरी मदत करणार आहे. केज शहरातील राजर्षी शाहू विद्यामंदिर या शाळेत पहिल्या उपक्रमात अंतर्गत हा टीव्हीसंच भेट देऊन त्यामध्ये इयत्ता पहिली ते दहावीचा



अभ्यासक्रम इन्स्टॉल करण्यात आला आहे. यावेळी सोलापूर रोटरीचे रो अतुल चव्हाण, रो महेश साळुंके, रो उदय शिंदे , केज रोटरीचे अध्यक्ष प्रकाश कामाजी, सचिव अनंत तरकसबंद, केज रोटरीचे हनुमंत भोसले, प्रवीण देशपांडे, सत्यवान राऊत, संस्थेचे अध्यक्ष ड. राजेसाहेब देशमुख, सचिव जी.बी.गदळे, मुख्याध्यापिका सौ. चाटे-गदळे, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी या महत्त्वाच्या उपक्रमाला आर्थिक सहाय्य करणाऱ्या मे.पी.पी.फौंडेशनचे केज रोटरीने विशेष आभार मानले.

# संपादकीय....

## शरद पवार - ठाकरे गटातील बेबनाव 'मविआ'च्या मुळावर

शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या महाविकास आघाडीच्या दोन घटकपक्षांत पुन्हा बेबनावाची ठिणगी पडली आहे. आधीच मरगळलेल्या, विस्कळीत झालेल्या आणि नाकाशी सूत धरलेल्या या महाविकास आघाडीवर या बेबनावाचे परिणाम होण्याची शक्यता दिवसेंदिवस अधिक स्पष्ट होत आहे. किंबहुना, या दोन पक्षांतील बेबनाव 'मविआ'च्या मुळावर येण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

शिवसेना शिंदे गटाचे सर्वेसर्वा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महादजी शिंदे पुरस्काराने नुकतेच गौरवण्यात आले. राजधानी दिल्लीत शरद पवार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार झाला आणि पवार यांनी शिंदे यांच्याविषयी प्रशंसोद्गारही काढले. शिंदे यांनी शिवसेनेत फूट पाडली, हा ठाकरे शिवसेनेचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पक्षाचे खा. संजय राऊत यांच्यासह अन्य नेत्यांचा आक्षेप. स्वाभाविकच, शरद पवार यांच्या हस्ते झालेल्या एकनाथ शिंदे यांच्या सत्कारामुळे संजय राऊत यांनी त्यावर अपेक्षेप्रमाणे शरसंधान केले; पण हे टीकास्त्र सोडताना, आपल्याच आघाडीतील एका घटकपक्षाच्या सर्वेसर्वा नेत्याला वाग्बाणाची झळ बसते, हे त्यांनी ध्यानी घेतले नाही किंवा जाणूनबुजून त्यांनी तिकडे दुर्लक्ष केले, असे म्हणायला पुरेसा वाव आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे अक्षरशः पानिपतच झाले. राष्ट्रवादी काँग्रेसची (शरद पवार) वाताहत झाली आणि ठाकरे शिवसेनेलाही चांगलाच धक्का बसला. त्यात आता भरीत भर म्हणून या दोन्ही पक्षांत गळती सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार सतीश चव्हाण यांनी पवारांची साथ सोडून पुन्हा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे, तर रत्नागिरीतील ठाकरे शिवसेनेचे ज्येष्ठ नेते राजन साळवी यांनी मशाल बाजूला ठेवून धनुष्यबाण हाती घेतले आहे. ठाकरे शिवसेनेच्या खासदारांमध्ये चलबिचल असल्याची चर्चा आहे आणि डॅमेज कंट्रोलसाठी आदित्य ठाकरे यांना दिल्लीला जावे लागत आहे, यातच ठाकरे शिवसेनेतील अस्वस्थता दिसून येते. आदित्य ठाकरे यांनी दिल्लीत अनेकांच्या भेटीगाठी घेतल्या. मात्र, शरद पवार यांची भेट त्यांनी टाळली, हे मोठे सूचक आहे. दोन्ही पक्षांतील स्थानिक स्वराज्य संस्थांतील कार्यकर्ते ही आपापल्या पक्षाला जय महाराष्ट्र करीत आहेत. महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या यांच्या निवडणुका जशा जवळ येतील, तशी ही गळती आणखी वाढेल, तिला वेग येईल, यात शंका नाही.

वाचावीर संजय राऊत यांच्या टीकेने भाजप आणि शिंदे शिवसेना गटाला आयतेच कोलीत मिळाले. भाजप नेते महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संजय राऊत यांना महाराष्ट्राची संस्कृती कळली नाही, असे वाभाडे काढीत शरद पवार यांची अप्रत्यक्ष प्रशंसा केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राऊत यांची चांगलीच हजेरी घेतली. राऊत यांची पवारांवरील टीका म्हणजे राऊत यांचे संतुलन बिघडले असल्याचे लक्षण असल्याचा घणाघात त्यांनी केला. दोन सत्तारूढ पक्षांच्या नेत्यांनी राऊत यांच्यावर केलेल्या पलटवाराने संजय राऊत यांचा मुखभंग झालाच; पण त्याबरोबरच शरद पवार यांच्याविषयी त्यांनी व्यक्त केलेली गौरवाची भावनाही जाणकारांच्या भुवया उंचावणारी ठरली आहे. शरद पवार यांची अलीकडील काही वक्तव्ये, शेतकर्यांच्या प्रश्नाच्या निमित्ताने डिसेंबर महिन्यात त्यांनी घेतलेली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट, या हालचाली सूचक मानता येऊ शकतात. कात्रजचा घाट दाखविण्यात माहीर असलेले शरद पवार आपला हातखंडा प्रयोग दाखवू शकतात. बिहारचे जनता दल (संयुक्त) नेते मुख्यमंत्री नितीश कुमार यांची पावले कशी पडतात, त्यावर शरद पवार यांची वाटचाल अवलंबून असल्याचे बोलले जाते. 'मविआ'चा तिसरा घटकपक्ष काँग्रेस पक्षाने आता नवीन प्रदेश अध्यक्ष निवडला आहे. हे शहाणपण खूप उशिरा सुचले. तोपर्यंत पक्षाची स्थिती खिळखिळी होत आली आहे. तिन्ही पक्षांची ही हालत लक्षात घेता, महाराष्ट्रात प्रबळ विरोधी पक्ष उरतो की नाही, अशी शंका निर्माण होत आहे. एकेकाळी काँग्रेसचे महाराष्ट्रात जवळजवळ एकछत्री राज्य होते. विरोधी पक्ष संख्याबळाने खूप कमी होते; पण विरोधी नेत्यांच्या मुलूखमैदान तोफा सत्ताधारी काँग्रेस पक्षाची गाळण उडवीत. तशी अपेक्षा सध्या कुणाकडून करावी, हा प्रश्नच आहे. मुळातच कमकुवत झालेल्या महाविकास आघाडीची परिस्थिती बुडत्याचा पाय खोलात, अशी झाली आहे. मात्र, उचलली जीभ लावली टाळ्याला, अशा प्रवृत्तीच्या वाचावीरांना त्याचे भान असल्याचे दिसत नाही.

# उशिरा पडलेले योग्य पाऊल

'सुबह का भुला अगर श्याम घर लौट आये, तो भुला नहीं कहते...' ही बाब खरी असली, तरी एखादी गोष्ट तब्बल अठरा वर्षांनी योग्य मार्गावर आल्याचा आनंद मानायचा का अठरा वर्षे वाया गेल्याचे दु:ख करायचे, हा प्रश्नच आहे. राज्यातील दहा लाखांवर लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरणाची स्थापना रितसर कायद्याद्वारे करण्याची सूचना केंद्र सरकारने २००६ मध्ये केली; पण अशा प्राधिकरणांना घटनात्मक स्वरूप देऊन, कागदी वाघाचे रूप बदलून त्यांना अधिकार देत अर्थपूर्ण करायचे, यासाठीची प्रक्रिया आठ दिवसांपूर्वी सुरू झाली. शहरे म्हणजे त्यांची लोकसंख्या जसजशी वाढत जाते, तसतशी त्यांची वाहतुकीची यंत्रणा गुंतागुंतीची, जटिल होत जाते. वाहतुकीच्या एक किंवा दोन यंत्रणा पुरेशा पडत नाहीत, तर विविध यंत्रणांची गरज लागते. त्यातील अनेक यंत्रणा एकमेकांवर अवलंबूनही असतात. शहरांच्या भौगोलिक परिस्थितीनुसार साधी बस, बीआरटी, लोकल रेल्वे, मोनो रेल, मेट्रो, रिक्षा, टॅक्सी आदी विविध वाहतूक यंत्रणांचा वापर होतो. या वेगवेगळ्या वाहतूक सेवा एकमेकींना स्पर्धक न ठरता पूरक असल्या पाहिजेत, त्यांची एकमेकांमध्ये योग्य ती गुंफण असणे आवश्यक ठरते. या प्रत्येक यंत्रणेने स्वतंत्र निर्णय केल्यास गोंधळ उडण्याची शक्यता असते. म्हणूनच या विविध वाहतूक यंत्रणांशी समन्वय साधण्याचे, त्यांना एका सूत्रात गुंफण्याचे, त्यांच्या कामांमध्ये सुसूत्रता आणण्याचे काम एका मध्यवर्ती प्राधिकरणाकडून होणे आवश्यक असते. कोणत्या मार्गावर साधी बससेवा असावी आणि कोणत्या मार्गावर बीआरटी असावी, रिक्षा-टॅक्सी-फिडर बससेवांचे मार्ग मेट्रोच्या स्थानकांपर्यंत कसे असले पाहिजेत, याचा आराखडा या प्राधिकरणाकडून होणे अपेक्षित असतो. या कारणांमुळेच महानगर वाहतूक प्राधिकरणाचा विचार जगभर झाला. अमेरिकेचे अध्यक्ष लिंडन जॉन्सन यांनी १९६४ मध्ये प्रथम सार्वजनिक वाहतुकीला बळ मिळावे, यासाठी अशा प्राधिकरणाची संकल्पना मांडली. आपल्या देशात केंद्र सरकारने नागरी वाहतूक धोरण २००६ मध्ये जाहीर केले. देशातील दहा लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरण म्हणजेच युनिफाईड मेट्रोपोलिटन ट्रान्स्पोर्ट अॅथॉरिटी (उमटा) स्थापन करण्याची सूचना हा या धोरणाचाच भाग होता. त्यानुसार देशातील काही शहरांमध्ये या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. राज्यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या महानगरांमधील लोकसंख्या दहा लाखांवर आहे. त्यांचा संतुलित विकास व्हावा, यासाठी या शहरांमध्ये महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या सूचनेनुसार या महानगरांतील वाहतूक यंत्रणेसाठी एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरण नेमण्याची गरज होती; मात्र त्यासाठी पावले मात्र प्रदीर्घ काळ उचलली गेली नाहीत. हे पाहून केंद्र सरकारने नाक दाबण्याची एक वेगळीच युक्ती प्रथम केली. शहरांमधील पायाभूत विकासकामांसाठी निधी देण्यासाठी जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण योजना म्हणजेच जेएनएनयूआरएम ही योजना आखण्यात आली. स्वतंत्र वाहतूक प्राधिकरण स्थापन करण्यात टाळाटाळ होते आहे, हे लक्षात आल्यावर केंद्राने निधी मिळवायचा असेल, तर प्राधिकरणाची स्थापना करण्याची अनिवार्य अट टाकली. त्याचा परिणाम झाला. पुण्यासारख्या शहरांमध्ये प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली.



अर्थात, रडतराऊंना घोड्यावर बसवल्यावर जी गत होते, तीच या प्राधिकरणांची झाली. ही प्राधिकरणे म्हणजे केवळ कागदी बुजगावणे ठरली. वास्तविक, या प्राधिकरणाच्या अध्यक्ष किंवा व्यवस्थापकीय संचालकपदी वाहतूक विषयांची माहिती असणार्या ज्येष्ठ अधिकार्याची नियुक्ती होणे आवश्यक होते, तसेच त्या महानगरातील सर्व वाहतूक यंत्रणांचे नियंत्रण प्राधिकरणामार्फत होण्याची गरज होती. प्रत्यक्षात केवळ केंद्राच्या निधीकडे डोळा असल्याने प्राधिकरणाची अट कागदोपत्री पुरी करण्यात आली आणि वाहतूक समन्वयाचा उद्देश कुठल्या कुठे वाहून गेला. पाच जिल्ह्यांचा प्रशासकीय कारभार सांभाळणार्या विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली या प्राधिकरणाच्या जुजबी बैठका होऊ लागल्या; पण त्यातील परिणामकारकताच हरवली गेली. महानगरांतील वाहतूक यंत्रणांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यांच्यात समन्वय येण्यासाठी कार्यक्षम यंत्रणा असलेले महानगर प्राधिकरण राज्यातील महानगरांमध्ये स्थापन व्हावे, यासाठी पंधरा दिवसांपूर्वी म्हणजे २८ जानेवारीला राज्य सरकारने पाऊल उचलले आहे. या प्राधिकरणांसाठी सुयोग्य यंत्रणा असावी, त्यांच्या कारभारासाठी नियमावली असावी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या सर्वांचा समावेश असणारा स्वतंत्र कायदा असावा, असे सरकारने ठरविले. ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत श्रावण हर्डीकर, अश्विनी जोशी, अश्विन मुदगल, अभिजित बांगर, कैलास शिंदे आदी शासकीय अधिकार्यांचाही समावेश आहे. नव्या कायद्याचे प्रारूप तयार करून ते राज्य सरकारला सादर करण्यासाठी या समितीला दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. अशारितीने केंद्र सरकारने २००६ पासून सुरू केलेली ही महानगर वाहतूक प्राधिकरणाची वाटचाल आता राज्य सरकारने कायदा करण्याच्या पावलापर्यंत आली आहे. देशाच्या २०११ च्या जनगणनेनुसार राज्यामधील मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर (तत्कालीन औरंगाबाद) आणि नाशिक या शहरांतील लोकसंख्या दहा लाखांवर होती, तर सोलापूरसारखे शहर दहा लाखांच्या उंबरठ्यावर (९ लाख ८१ हजार) होते. नव्या कायद्याला मान्यता आणि त्याची अंमलबजावणी या बाबी वेळेत झाल्यास या महानगरांमधील वाहतूक यंत्रणेला सूर सापडेल, अशी आशा आहे.

# मंत्रालयात अनुशासन पर्व

महायुतीचे सरकार दणदणीत बहुमताने सत्तेत येऊनही एक अनामिक, राज ठाकरेंचा शब्द उसनवार घेऊन सांगायचे तर 'अनाकलनीय' हुरहुर महाराष्ट्राच्या वातावरणात जाणवते आहे. येत्या ५ मार्चला या सरकारचे शंभर दिवस पूर्ण होतील; पण खुद्द महायुतीचे सत्ताधीश या शंभर दिवसांचा किती जल्लोष करतील, याचा अंदाज अजून येत नाही. मुळात सरकारचे काय सुरू आहे, याचाच अंदाज येणे कठीण चालले आहे. तीन घटकपक्षांच्या सरकारात काही तरी सतत घडत आहे, ठसठसत आहे आणि ते कळत मात्र नाही.



यातून समस्त पत्रकारांनाही बद्धकोष्ठ झाल्यासारखे झालेले दिसते. कोंदटलेल्या राजकारणात काही तरी किक देणारे धमाकेदार असे घडावे आणि ही चलबिचल थांबावी, असे त्यांना वाटते; पण वाटून उपयोग काय? पत्रकारांची ही विच्छा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काही पूर्ण करत नाहीत. उपमुख्यमंत्री अजित पवार हे अजूनही तुसड्यासारखे बोलतात म्हणून त्यांच्याकडे जाऊन राजकीय गजाली करण्याचे धारिष्ट्य फार पत्रकार दाखवत नाहीत. चॅनलच्या बूमसमोर दिले जातील तितक्याच बाईटमधून अजित पवारांचे राजकीय विचार महाराष्ट्राला कळतात. बाकी सरकारात त्यांचे फडणवीस यांच्यासोबत वाईट चालण्याचे कारण नाही. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कसे सुरू आहे? त्यांचे आता बरे चालले आहे, असेही अजून तरी कळलेले नाही. उपमुख्यमंत्री व्हावे लागल्यापासून शिंदे नाराज आहेत. या सत्तेत त्यांचा जीव रमत नाही. फडणवीस यांनी घेतलेल्या बहुतांश बैठकांना शिंदे हजर राहिलेले नाहीत. ते कुठे महाराष्ट्राच्या कोपर्यात आहेत आणि त्याचवेळी फडणवीस यांनी बैठक लावली, असे घडले असते तर शिंदे यांची गैरहजेरी समजण्यासारखी होती. मात्र, ठाण्यात किंवा मुंबईत एखादद्सरा कार्यक्रम असतानाही शिंदे यांनी फडणवीस यांच्या बैठकांकडे पाठच फिरवली. शिंदे यांच्याकडे नगरविकाससारखे मोक्याच्या भूखंडासारखे खाते आहे. या खात्याच्याही आढावा बैठकीला उपस्थित राहावे, असेही शिंदे यांना वाटले नाही. मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकांतही शिंदे यांनी फार स्वारस्य दाखवलेले नाही. या बैठकांनाही त्यांची उपस्थिती तुरळक राहिली आहे. जेमतेम एक-दोन किंवा तीन-चार निर्णय घेणार्या मंत्रिमंडळ बैठकांत मजा नाही, असे त्यांना सुचवायचे असेल. लोकसभा, विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर शिंदे यांनी मंत्रिमंडळ बैठकांचा धडाका लावून निर्णय संख्येचे विक्रम रचले. राज्याची आर्थिक घडी विस्कटेल, असे निर्णय घेण्याची घाई आज मुख्यमंत्री म्हणून फडणवीस यांना नसावी किंवा गेल्या सहा महिन्यांत महाराष्ट्राची आर्थिक घडी विस्कटू शकेल, असे निर्णय काळाची गरज म्हणून घेतले असतील. ते हळूहळू दुरुस्त करण्याची जबाबदारी आता फडणवीस यांच्यावर येऊन पडली असू शकते आणि म्हणून मंत्रिमंडळ निर्णयांचा ग्राफ झपकन खाली आलेला आपल्या दिसतो. काय असेल ते असो; पण कारभार संथगतीने सरकतो आहे आणि राजकारणाच्या उथळ पाण्याचा खळखळाट मात्र वाढला आहे. इतका की, या उथळ पाण्याचाही अंदाज बोरूबहाद्दर आणि बूमधारी आखाड्याच्या महंतांना येईनासा झाला आहे.

कुणी म्हणतो हे फडणवीसांचे अनुशासन पर्व आहे. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेताच नव्या एस.टी. गाड्या खरेदी करण्याचा निर्णय फडणवीस यांनी रोखला आणि चौकशीचे आदेश दिले. आज मंत्री असलेले शिंदे गटाचे भरत गोगावले यांनी आपल्या औटघटकेच्या एस.टी. महामंडळ अध्यक्षपदाच्या राजवटीत हा निर्णय घेतला होता. त्याचीच चौकशी म्हणजे शिंदे गटाला पहिला दणका. मागच्या राजवटीत संजय शिरसाट हे शिंदे गटाचे बिनीचे शिलेदार असूनही त्यांना मंत्रिपद मिळाले नव्हते. निवडणुकांच्या टप्प्यात त्यांनाही सिडकोचे अध्यक्षपद देण्यात आले. 'माझी नियुक्ती पाच वर्षांसाठी आहे, अशी जाणीव त्यांनी त्यांच्या विनम्र शैलीत सिडको प्रशासनाला करून दिली. बैठकांचा धडाका लावला. नव्या सरकारात ते कॅबिनेट मंत्री झाले तरी सिडकोचा मोह काही सुटेना! एकाचवेळी कॅबिनेट मंत्री आणि त्याच दर्जाचे सिडकोचे अध्यक्षपद दोन्ही लाभाची पदे! एक पद - सिडकोचे सोडा, असे शिरसाट यांना कानात सांगता आले असते; पण एक दिवस अचानक नगरविकास खात्याने खास जीआर काढून शिरसाट यांची सिडकोच्या अध्यक्षपदावरून हकालपट्टी केली. शिंदे यांना दिलेला हा दुसरा दणका, असाच अर्थ या निर्णयाचा लावला गेला. परिवहनमंत्री म्हणून एस.टी. महामंडळाचे अध्यक्षपद आता आपल्याकडेच, असे गृहीत धरून सुसाट निघालेली प्रताप सरनाईकांची एक्स्प्रेस फडणवीस यांनी अशीच रोखली आणि तुटीच्या आजाराने जर्जर एस.टी.ला आयएएस अध्यक्ष दिला. त्याच्या दुसर्याच दिवशी प्रताप सरनाईक शिंदे यांच्यासमोर तासभर बसून होते. या अनुशासन पर्वात फडणवीस यांची प्रशासनावरील पकड इतकी मजबूत की, कालपर्यंत आपलेच विश्वासू वाटणारे एमआयडीसीचे अधिकारी कधी परस्पर निर्णय घेऊ लागले, हे उद्योगमंत्री उदय सामंत यांना कळलेदेखील नाही.

मंत्रालयात गेल्या राजवटीत अनेक निर्णय घेणारे आणि फिरवणारे काही चेहरे आणि मोहरे फडणवीसांच्या या अनुशासन पर्वात अकस्मात बेपत्ता होऊ लागलेले दिसतात. बहुचर्चित 'मित्रा'चे अध्यक्ष अजय अशर आता मंत्रालयातच काय, मंत्रालयाच्या परिसरातही दिसत नाहीत. मुख्य सचिवांना हटवण्यास निघालेले इक्बालसिंह चहल यांचा आवाज बंद झाला आहे. एक कुणी आनंद माडिया नावाचे गृहस्थ असेच मंत्रालयात घुसून कारभार करू लागले होते. मुख्यमंत्र्यांचे ओएसडी असल्याचे ते सांगत. त्यांचे लिंक्डइनचे प्रोफाईल आजही हेच पद मिरवते. आज हे माडिया कुठे आहेत? ते रजेवर असल्याचे म्हणतात. अनुशासन पर्वात मंत्रालयात असे 'लापता लोग' वाढतील आणि हळूहळू प्रशासन स्वच्छ होईल. या स्वच्छता मोहिमेत काही घटक अस्वस्थ होऊ शकतात; पण त्यांच्यासमोर सत्तेत टिकून राहण्याखेरीज दुसरा पर्याय तरी काय आहे?

# काणसा वारणा फाउंडेशन राष्ट्रीय लातूर जिल्ह्याची जम्बो कार्यकारणी जाहीर

लातूर :– कांनसा वारणा फाउंडेशनचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष गोल्डमॅन जनसेवक श्री,दीपक दादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली तसेच युवा जिल्हाध्यक्ष अ.नगर काणसा वारणा फाउंडेशन महाराष्ट्र राज्य गोकुळ आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली कानसा वारणा फाउंडेशन राष्ट्रीय लातूर जिल्ह्याची जम्बो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली, सदर कार्यक्रम कानसा वारणा फाउंडेशन ऑफिस कर्जत ( रायगड )या ठिकाणी संपन्न झाला कानसा वारणा फाउंडेशनची लातूर जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी पुढील प्रमाणे यामध्ये किशन काशिनाथ डोंबाळे युवा जिल्हा अध्यक्ष लातूर, सतीश विठ्ठल कराड युवा उपाध्यक्ष लातूर जिल्हा, विशाल महादेव चंद्रपाटले लातूर शहर प्रमुख, अल्पेश उत्तम नागरगोजे लातूर जिल्हा प्रमुख (ग्रामीण), नागनाथ भताने युवा कार्याध्यक्ष लातूर, सिद्धार्थ गुजरंगे युवा सचिव लातूर, अनुज पाटील युवा अध्यक्ष विद्यार्थी आघाडी लातूर, शिवायन मस्के युवा उपाध्यक्ष विद्यार्थी आघाडी लातूर (ग्रामीण), सुदर्शन पिटले युवा खजिनदार लातूर (ग्रामीण), रामेश्वर केंद्रे युवा सचिव लातूर ( ग्रामीण), सुशील पोतले युवा अध्यक्ष विद्यार्थी आघाडी लातूर ( ग्रामीण ), अभय वैष्णव युवा कार्याध्यक्ष लातूर (ग्रामीण), अतुल गायकवाड युवा खजिनदार लातूर (ग्रामीण), आकाश गायकवाड युवा अध्यक्ष लातूर (ग्रामीण), देवा अडसुळे युवा उपाध्यक्ष लातूर (ग्रामीण) , कानसा वारणा फाउंडेशन राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष गोल्डमॅन जनसेवक श्री. दिपक दादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली तसेच युवा जिल्हाध्यक्ष अ.नगर गोकुळ आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली निवड करण्यात आली,तसेच सर्व नवनियुक्त पदधिकारी हे नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असतात यांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास करून निवड करण्यात आली, नवनियुक्त पदधिकारी यांना विविध पदाची धुरा देण्यात आली, कांनसा वारणा फाउंडेशन राष्ट्रीय सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक,तसेच राजकीय चळवळीचे मुक्त व्यासपीठ म्हणून ओळखले जाते,नवनियुक्त पदधिकारी यांच्या कार्याने कानसा वारणा फाउंडेशन राष्ट्रीय हे नाव लातूर जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात जाईल येत्या काळात लातूर जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात फाउंडेशनचा धबधबा निर्माण करू यावेळी बोलताना युवा जिल्हाध्यक्ष अ.नगर गोकुळ आंधळे यांनी विश्वास व्यक्त केला, कांनसा वारणा फाउंडेशनचे काम महाराष्ट्रभर चालत आहे तसेच इतर ही राज्यात काम चालू आहे, तरुणांना संघटित करून चागंला महाराष्ट्र घडवूया शिक्षीत व निर्व्यसनी पिढि घडवूया अंधश्रद्धा निर्मूलन व व्यसनमुक्त महाराष्ट्र घडवूया सर्वांना मान,सन्मान द्या पोलीस मित्र म्हणून जनतेची सेवा करूया समाजात अभिमान वाटेल असे तरूण घडवूया यावेळी बोलताना संस्थापक अध्यक्ष श्री.दिपक दादा पाटील,यावेळी कांनसा वारणा फाउंडेशनचे पदधिकारी उपस्थित होते, नवनियुक्त पदधिकारी यांचे विविध स्तरावर अभिनंदन होत आहे.

# होती दाढी म्हणून तुमची उद्धवस्त झाली महाराष्ट्र विरोधी आघाडी; एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

रत्नागिरी : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आभार यात्रा आज रत्नागिरीत पोहोचली आहे. यावेळी एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार संजय राऊत यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. ते म्हणाले, महाराष्ट्रातील जनतेने तुम्हाला खोक्यात बंद करण्याचं काम केलं. ते म्हणायचे की कोण एकनाथ शिंदे, कोण रामदास कदम? पण आम्ही कोण आहोत हे त्यांना दाखवून दिलं. त्यामुळे दाढीवाल्यांना हलक्यात घेऊ नका, असा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना दिला आहे.

काय म्हणाले एकनाथ शिंदे ?

एकनाथ शिंदे म्हणाले, नारायण राणेंना सर्वात जास्त माहिती आहे की, कुणाचे खोके कुठे आहेत? या महाराष्ट्रातील जनतेने विरोधकांना खोक्यात बंद करुन टाकलं आहे. आता तरी खोके म्हणायचं बंद करा. पण रस्सी जळाली तरी रस्सीचा पीळ जात नाही. कोकणात शिवसेना वाढवण्यासाठी नारायण राणे आणि रामदास कदम यांनी त्या काळात खूप काम केलं. मी देखील नेहमी सांगायचो की जर पक्ष मोठा करायचा असेल तर कार्यकर्त्यांना बळ द्या, त्यांना वाढवा. मात्र, याबाबतचा अनुभव रामदास कदम यांनी घेतला. नारायण राणे यांनी देखील याचा अनुभव घेतला, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

पुढे बोलताना म्हणाले, शिवसेना हा पक्ष कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. आपल्या पक्षात कोणीही मालक नाही. राजाचा मुलगा राजा नाही, तर जो काम करेल तो राजा बनेल असा आपला पक्ष आहे. आधी ते म्हणायचे की कोण एकनाथ शिंदे? कोण रामदास कदम? पण आम्ही कोण आहोत हे त्यांना दाखवून दिलं. आम्हाला हलक्यात घेऊ नका. आम्ही कार्यकर्ते म्हणून काम करणारे आणि न्याय देणारे लोक आहोत, असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं.

राजन साळवी आपल्याकडे आले आहेत. पण त्यांनी खरं तर अडीच वर्षांपूर्वीच आपल्याकडे यायला पाहिजे होतं. पण आता ते आपल्याकडे आलेत. कोकणात एकापेक्षा एक चांगले कार्यकर्ते शिवसेनेत का येत आहेत? ज्या पक्षाला विचारांची वाळवी लागली त्या पक्षात राजन साळवी तरी कसे राहतील? मग तेही आले शिवसेनेत, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर केली.

होती दाढी म्हणून उद्धवस्त झाली आघाडी

ते पुढे म्हणाले की, होती दाढी म्हणून तुमची उद्धवस्त झाली महाराष्ट्र विरोधी आघाडी, आणि सुरू झाली विकासाची आघाडी. कशाला माझ्या नादाला लागता. मी कुणाच्या नादी लागत नाही. मी आरोपाला उत्तर देत नाही. मी कामातून उत्तर देतो. विकासाची कोणतीही योजना बंद होणार नाही. आम्ही खोटी आश्वासने देत नाही. जे बोलतो ते आम्ही करून दाखवतो. आम्ही पूर्ण विचार करून योजना केल्या आहेत, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

# महाराष्ट्रात पुन्हा राजकीय गोंधळ! शरद पवारांकडून पुरस्कार स्वीकारण्यावरून टीका



राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी नुकतेच एका कार्यक्रमादरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सन्मान केला. आता ठाकरे गटाचे माजी आमदार राजन साळवी यांनी शेकडो समर्थकांसह शिवसेना शिंदे गटात सामील झाले. तेव्हापासून महाराष्ट्रात राजकीय हालचाली पुन्हा तीव्र झाल्या आहेत. दरम्यान, शिवसेना ठाकरे गटासह महाविकास आघाडीच्या नेत्यांनी लक्ष्य केल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, राष्ट्रवादी काँग्रेस (सपा) चे अध्यक्ष शरद पवार यांनी माझे स्वागत केल्याने विरोधी पक्षाचे नेते नाराज आहेत. त्यांनी महायुतीची काळजी करू नये. महायुतीतील सर्वजण एकत्र काम करत आहेत आणि एकजूट आहेत. आम्ही महाराष्ट्राच्या विकासासाठी काम करत राहू.

विरोधकांनी शरद पवारांचा अपमान केला

शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, शरद पवार यांच्याकडून मला मिळालेला पुरस्कार हा संपूर्ण महाराष्ट्रासाठी सन्मान आणि अभिमानाचा विषय आहे, परंतु माझा द्वेष करणाऱ्यांनी या पुरस्काराचा अपमान केला आहे. त्यांनी शरद पवारांचा अपमान केला आहे. जनता त्यांना माफ करणार नाही. एका मराठीला दुसऱ्या मराठीकडून सन्मान मिळण्यात काय गैर आहे?

अधिकाऱ्यांचे एक पथक कुंभमेळ्याच्या तयारीचा आढावा घेणार

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या म्हणण्यानुसार, प्रयागराज महाकुंभासाठी केलेल्या व्यवस्थेबद्दल मी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याशी बोललो आहे. कुंभस्नानासाठी मोठ्या संख्येने लोक प्रयागराजमध्ये आले आहेत. महाकुंभासाठी केलेल्या व्यवस्थेची माहिती घेण्यासाठी अधिकाऱ्यांचे एक पथक तेथे जाईल. राज्य पथक तेथे कुंभमेळ्याच्या तयारी आणि पद्धतींचा अभ्यास करेल. त्यानंतर आम्ही सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी योग्य व्यवस्था केली जाईल याची खात्री करू.असेहि त्यांनी म्हटले.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर एकनाथ शिंदे यांनी हे विधान केले. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील उपस्थित होते.

'एकनाथ शिंदे जिथे उभे आहेत तिथूनच रांग सुरू होते' एज्ञपरींह ड्हळपवश जप ड्हरीरव झरुरी ।

संजय राऊत यांच्यावर निशाणा साधत ते म्हणाले, ज्याप्रमाणे मुघलांचे घोडे संताजी आणि धनाजी सगळीकडे पाहत असत, त्याचप्रमाणे ते मलाही पाहत आहेत. माझी रेषा कापण्याऐवजी तुमची रेषा वाढवा. एकनाथ शिंदे जिथे उभे असतात तिथे जनसेवेची रेषा तिथून सुरू होते. राज्यातील जनतेने पाहिले आहे की एका सामान्य शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री होऊ शकतो.

# पर्यटन क्षेत्रातील उद्यमीला मुकलो

मुंबई : प्रतिनिधी–पर्यटन क्षेत्रातील संधीची ओळख करून देणारा, महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेणारा उद्यमी म्हणून उद्यमशील केसरीभाऊ पाटील यांचे नाव सदैव स्मरणात राहील, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'केसरी टूर्स'चे संस्थापक, अध्यक्ष केसरीभाऊ पाटील यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.उद्योग–व्यवसायाच्या एखाद्या नव्या क्षेत्रात उतरून, त्यामध्ये नाव कमावून ते आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याची क्षमता केसरीभाऊ पाटील यांनी आपल्या अंगी असलेल्या व्यवस्थापन आणि उद्योजकतेच्या कौशल्याच्या जोरावर सिद्ध केली.'केसरी टूर्स'च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या उद्यमशीलतेची ओळख जगभर पोहोचवली. या क्षेत्रातील रोजगार आणि व्यवसाय, व्यवस्थापन संधीची माहिती आणि अनेकांना या क्षेत्रात येण्याची प्रेरणा देण्यात ते मार्गदर्शकाची भूमिका बजावत असत.त्यांच्या निधनामुळे एका धडाडीच्या, उद्यमशील अशा व्यक्तिमत्त्वाला आपण मुकलो आहोत. केसरीभाऊ यांच्या आत्म्यास शांती लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांच्या कुटुंबियांच्या, केसरी समूहाशी निगडित सहृदयींच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.



# संत सेवालाल महाराज सर्वधर्म समभावाचे प्रतिक – वसुदेव( बप्पा) गायकवाड



केज/प्रतिनिधी स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे १५ – फेब्रुवारी २०२५ रोजी संत सेवालाल महाराज यांची जयंती व्याख्यान कार्यक्रम घेवून साजरी करण्यात आली. संत सेवालाल महाराज हे सर्वधर्म समभावाचे प्रतिक असल्याचे प्रतिपादन व्याख्यान देताना व्याख्याते, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, माजी प्राचार्य वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांनी केले अध्यक्ष स्थानी जेष्ठ नागरीक व प्रगतशील शेतकरी रंगनाथ गायकवाड हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संजय सोनवणे, शिवाजी गायकवाड, महादेव गायकवाड, रविंद्र गायकवाड, ताराचंद गायकवाड यांची उपस्थिती होती. यावेळी शशीकांत गायकवाड, शंकर गायकवाड, साक्षी गायकवाड, अनुजा घोगले, सोहम गायकवाड, यश जोगदंड, शिवराज भोगजकर, श्रुती पुंड, रामकृष्ण( तात्या) गायकवाड यांच्यासह वाचक, हितचिंतक यांची उपस्थिती होती. तसेच १० फेब्रुवारी २०२५ रोजी विश्वकर्मा जयंती विनांक १३ फेब्रुवारी २० २५ रोजी संत निवृत्तीनाथ जयंती , दिनांक १४ फेब्रवारी २०२५ रोजी भिमाई आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. सर्वच कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन, आभारप्रदर्शन आनंद( भैय्या) गायकवाड यांनी केले.

# संजय पाटील राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित




चाकूर ( वा) उदगीर येथील रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठान व मराठी पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांच्या हस्ते चाकूर येथील पत्रकार संजय पाटील यांना सन्मानचिन्ह,गौरवपत्र आदर्श पत्रकारीता पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले आहे.यावेळी अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कवी व साहित्यिक प्रा.इंद्रजित भालेराव तर मंचावर स्वागताध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, सिनेअभिनेते चंद्रशेखर सांडवे,रामचंद्र तिरूके,सिनेअभिनेत्री अदिती सारंगधर,ऊर्मिला डांगे,साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ.मार्तंड कुलकर्णी,ज्येष्ठ कवी भारत सातपुते, विलास सिंदगीकर,रमेश अंबरखाने,प्रा. बिभीषण मद्देवाड,पत्रकार सिद्धार्थ सुर्यवंशी उपस्थित होते. पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा मराठवाडा स्तरीय सन २०२३–२०२४ चा पत्रकारिता पुरस्कार उत्कृष्ट वार्ता गटातून प्रथम पुरस्कारसंजय पाटील यांना प्रदान करण्यात आला.

प्रसंगी सुनिता मंडलापुरे,संगीता बुलबुले,श्रीदेवी पाटील,अपूर्वा पाटील यांच्यासह पत्रकार व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. संजय पाटील यांच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे

# राज्यात फेब्रुवारीतच तापमानाचा पारा वाढला

राज्यात आता हळूहळू उन्हाचे चटके बसू लागले आहेत. मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यात तापमानाचा पारा चांगलाच वाढला आहे. याठिकाणी तापमान ३५ ते ३८ अंशांपर्यंत पोहचला आहे. त्यामुळे नागरिकांना उन्हाच्या झळा सोसाव्या लागत आहेत.

पुण्यात पारा वाढला मागील काही दिवसांपासून राज्यात तापमानात चढ उतार पाहायला मिळाला. मध्य महाराष्ट्रात पहाटे काहीसा गारवा आणि दुपारी कडक उन्हाचा पारा वाढताना दिसत आहे. त्यात नंदुरबारमध्ये कमाल तापमानाने ४० अंश काल ओलांडले. पुण्यात बहुतांश ठिकाणी तापमानाचा पारा ३५–३८ अंशांपर्यंत गेला. साताऱ्यात कराडमध्ये तापमान ४० अंश झाले होते. बहुतांश ठिकाणी साधारण कमाल तापमान असेच होते.

राज्यात कसे राहणार तापमान? महाराष्ट्रातील हवामान सध्या कोरडे असून, तापमानाचा पारा चांगलाच वाढलेला दिसतो. राज्यातील बहुतांश भागांत उन्हाची तीव्रता वाढली असून, आकाश निरभ्र राहिल्यामुळे उष्णतेची लाट जाणवत आहे.

# महाशिवरात्रीच्या उपवासात दिवसभर शरीरातील ऊर्जा टिकून राहण्यासाठी बनवा सुकामेवा सॅलड

यंदाच्या वर्षी २६ फेब्रुवारीला महाशिवरात्री उत्सव साजरा केला जाणार आहे. महाशिवरात्री उत्सव राज्यासह देशभरात मोठ्या आनंदात आणि थाटामाटात साजरा केला जातो. महाशिवरात्रीच्या दिवशी शंकराची मनोभावे पूजा केली जाते. शिवाय अनेक महिला या दिवशी उपवास करतात. तसेच शंकराला बेल, दूध इत्यादी पदार्थ अर्पण केले जातात. उपवास केल्यानंतर फळे, साबुदाण्याची खिचडी, बटाट्याची भाजी इत्यादी पदार्थ खाल्ले जातात. तर अनेक महिला उपवासाच्या दिवशी जास्त पदार्थ खाणे टाळतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला महाशिवरात्रीच्या उपवासात सुकामेवा सॅलड बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. सुकामेवा खाल्यामुळे पोट दीर्घकाळ भरलेले राहत. याशिवाय या पदार्थाचे सेवन केल्यामुळे



संपूर्ण दिवस आनंद आणि उत्साहात जातो. चला तर जाणून घेऊया सुकामेवा सॅलड बनवण्याची सोपी रेसिपी. साहित्य: कलिंगड सफरचंद केळी बदाम चिकू अक्रोड तुम्हाला आवडणारी इतर फळे कृती: सुकामेवा सॅलड बनवण्यासाठी सर्वप्रथम, सर्व फळे स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर सर्व फळांचे बारीक तुकडे करा. मोठ्या बाऊलमध्ये कापून घेतलेले सफरचंद, केळी, चिकू, कलिंगड इत्यादी सर्व फळे एकत्र करून घ्या. त्यानंतर त्यात भिजवून साल काढून घेतलेले बदाम आणि अक्रोड टाकून मिक्स करा. सगळ्यात शेवटी तयार करून घेतलेल्या सॅलडमध्ये काजू टाकून मिक्स करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले सुकामेवा सॅलड. हे सॅलड तुम्ही इतर वेळी सकाळच्या नाश्त्यात सुद्धा खाऊ शकता.

# देव म्हणजे ईश्वर नव्हे,तर ती एक जमात..

लातूर :सध्याच्या काळात देव म्हणजे ईश्वरच आहे,असे अनेक जण समजतात; परंतु, देव म्हणजे ईश्वर नसून आर्य संस्कृतीच्या काळात देव नावाची एक जमात होती. त्या जमातीला अग्नी रक्षणाची कला अवगत होती आणि ती कला त्यांनी इतर कोणालाही कळू दिली नाही, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या १९व्या विद्रोही साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. अशोक राणा यांनी केले. येथील लोकसेवक संघ लातूर, जागर समतेचा, अंधश्रद्धा निर्मूलन समिती लातूर, जी २४ ग्रुप, मराठा लिबरेशन टायगर, लोकशाही उत्सव समिती या प्रागतिक विचारांच्या संघटनांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. अशोक राणा यांचा शुक्रवारी डॉ. नागोराव कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली व आंबेडकरी विचाराचे पुरस्कर्ते सदाशिव अभंगे यांच्या हस्ते शुक्रवारी सत्कार करण्यात आला.यावेळी ते बोलत होते.व्यासपीठावर माधव बावगे,नरसिंग घोडके, डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे, प्रा. सुधीर अनवले उपस्थित होते.

डॉ. राणा पुढे म्हणाले की, मराठीच्या प्राध्यापकाने



मराठी भाषेची निर्मिती कशी झाली, हे शोधून काढले पाहिजे.भाषा हा विषय निरंतर चिंतनाचा विषय आहे.मराठमोळी संस्कृती असा उच्चार केला जातो. परंतु मोळी या शब्दाचा अर्थ गठ्ठा नसून बोली असा असावा. संस्कृत भाषेपासून मराठी भाषेची निर्मिती झाली. संस्कृत म्हणजे संस्कार केलेली भाषा. मग संस्कृत भाषा कोणत्या भाषेपासून तयार झाली..? प्राकृत बोली भाषा ही मुळ भाषेच गाभा आहे. पाली,अर्धमागधी आणि प्राकृत भाषांचा मराठी भाषेच्या संशोधनासाठी काय उपयोग करता येतो, याचा विचार करायला हवा. परंतु कान, डोळे व तोंड बंद ठेवून प्रत्येक जण दहशतीखाली वावरत असल्याचे दिसून येते. अभिजात मराठी भाषा पुण्याच्या ब्राह्मणाच्या तोंडून निघालेली भाषा आहे, असा समज पसरविण्यात आला. भाषा विषय म्हणजे बहुजनांच्या शोषणाचे हत्यार बनत आहे. जातीबरोबर भाषेचाही शोषणासाठी वापर केला जाऊ लागला असून बुद्ध व येशुनी सर्व अन्याय सहन केले. परंतु मराठीच्या मानगुटीवर संस्कृतची बसलेली वेलांटी काढून टाकावी लागणार आहे, असेही ते याप्रसंगी म्हणाले.

या कार्यक्रमात प्रा.डॉ. अशोक नारनवरे यांनी डॉ. अशोक राणा यांचा परिचय करुन दिला.पंचशील डावकर यांनी संचालन केले तर आभारप्रदर्शन सदाशिव अभंगे यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ . अनिल जायभाये, डी.उमाकांत, चंद्रशेखर कत्ते,डॉ.गणेश गोमारे,राहूल लोंढे,अखिलेश आयलाने आदींनी प्रयत्न केले. या कार्यक्रमास साहित्यिक,विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरू रविदास आणि संत सेवालाल यांना 'जी – २४ ' चे अभिवादन




लातूर – ' जी –२४ ' अंतर्गत गुरू रविदास सार्वजनिक जयंती समितीच्या वतीने संत शिरोमणी रविदास महाराज आणि संत सेवालाल यांच्या जयंतीच्या निमीताने लातूर येथील गुरू रविदास चौक आणि राजीव गांधी चौकात संत सेवालाल यांच्या प्रतिमांना पुष्पाहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य सोमनाथ रोडे, प्राचार्य नागोराव कुंभार, प्राचार्य आर. डी. निटूरकर, प्रा.डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे, प्रा.शेषेराव हलगरकर, प्रा . युवराज वाघमारे, कैलास कांबळे, पिराजी साठे, प्रविण कांबळे, शेरखाने गुरूजी, प्रा.सुधीर अनवले, प्रा.मकबूल शेख, गणेश रेकूळवाड,नरसिंग घोडके, शिरीष दिवेकर,इंजि. श्रीधर शेवाळे, रामराजे आत्राम, इंजि.श्याम साळुंके, सिध्दार्थ सूर्यवंशी, लक्ष्मण दावणकर , डी.एस. सूर्यवंशी, गौतम सोनकांबळे , सुभाष सूर्यवंशी आदी मान्यवरांसह 'जी –२४ ' आणि विविध पुरोगामी संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी मान्यवरांची समायोजित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नरसिंग घोडके यांनी केले तर यु.डी. गायकवाड यांनी आभार मानले.

# औसा शहरातील सावली लॉजवर छापा, वेश्या व्यवसाय चालविल्याने दामिनी पथकाची कारवाई

औसा :– औसा शहरातील सावली लॉजवर छापा, वेश्या व्यवसाय चालविल्याने दामिनी पथक, –क्ख्ण पथकाची कारवाई

याबाबत अधिक माहिती अशी की, औसा शहरातील सावली लॉजवर दामिनी पथक व –क्ख्ण शाखेने छापा टाकून १ महिलेची सुटका केली व वेश्याव्यवसाय चालविणाऱ्या २ आरोपीं विरुद्ध औसा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे.

औसा शहरात लॉज व हॉटेलच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालविला जात असल्याबाबत गुप्त माहिती मिळाल्याने सदर बाबत कडक कारवाई करणेसाठी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे कडून सक्त आदेश पारित झाले होते.

त्याअनुषंगाने औसा शहरातील सावली लॉज तुळजापूर टी पॉइंट निलंगा रोड येथे तेथील मालक व मॅनेजर काही महिलांना लॉजवर आणून वेश्या गमनासाठी एजंट करवी गिऱ्हाईक आणून वेश्या व्यवसाय चालवीत आहेत अशी गुप्त माहिती प्राप्त होती.

मिळालेल्या माहितीची खातरजाम करून त्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शनाखाली पथकाने बनावट ग्राहक वेश्या गमनाच्या नावाखाली लॉजवर पाठविण्यात आला होता. बनावट ग्राहकाकडून इशारा मिळतात पथकाकडून सावली लॉजवर छापा टाकण्यात आला. सदर छाप्यात बाहेर गावाहून आणलेली एक महिला मिळून आली तर लॉज मॅनेजरला लॉजवरून ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर प्रकरणी वेश्या गमनासाठी आणलेल्या एक महिलांची सुटका करण्यात आली आहे तर आरोपी नामे १) प्रवीण बालाजी कल्याणी वय २२ वर्षे, राहणार उत्का, तालुका औसा. २) व्यंकट गोरोबा जगताप, राहणार संभाजीनगर औसा.(लॉजचा चालक) यांचे विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे पुढील तपास औसा पोलीस हे करीत आहेत. वेश्या व्यवसाया बाबत काही माहिती मिळाल्यास त्याबाबत –क्ख्ण कक्ष, पोलीस अधीक्षक कार्यालय लातूर येथे कळविण्या बाबत लातूर पोलिसांकडून आवाहन करण्यात येत आहे.

सदरची कारवाई सोमय मुंडे, पोलिस अधीक्षक, लातूर ,डॉ. अजय देवरे, अपर पोलिस अधीक्षक, लातूर यांचे मार्गदर्शनात, दामिनी व –क्ख्ण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दयानंद पाटील, पोलिस उपनिरीक्षक सुभाष सूर्यवंशी, पोलीस अंमलदार सदानंद योगी, प्रकाश जाधव, महिला अमलदार लता गिरी, मीना पवार, मीरा सोळंके, सुजाता चिखलीकर, यांनी केली आहे.

# वसंतराव नाईक महाविद्यालयात संत सेवालाल महाराज जयंती साजरी

छ.संभाजी नगर (प्रतिनिधी) :– दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी संत सेवालाल महाराज यांची जयंती महाविद्यालयातील बंजारा संस्कृती व संवर्धन केंद्र येथे उत्साहात पार पडली . या कार्यक्रमात बंजारा समाजातील परंपरा चालीरीती व परंपरा यांचा मिलाफ दिसून आला .याप्रसंगी फुलसिंग जाधव यांनी संत सेवालाल महाराज यांनी सर्वांची आईसमान काळजी घेतली व विश्वकल्याणासाठी आयुष्य वेचले असे प्रतिपादन केले.श्री सुखदेवजी चव्हाण यांनीही आपली पारंपारिक संस्कृती टिकवून ठेवावी असे आवाहन केले. पंडित महाराज यांनी संत सेवालाल महाराज यांचे विचार आणि बंजारा समाजातील धार्मिक व सामाजिक परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले .या जयंती मधून सामाजिक सलोखा निर्माण होतो असे मत व्यक्त केले . याप्रसंगी कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य राजारामजी राठोड यांनी मार्गदर्शन करतांना संत सेवालाल महाराजांनी दाखवून दिलेल्या मार्गावर चालण्याची गरज असल्याचे नमूद केले.या कार्यक्रमात लेंगीलोकनृत्य तसेच बंजारा समाजातील विविध चालीरीती व सांस्कृतिक विविधता यांचे दर्शन या निमित्ताने महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना घडले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. सुभाष



चव्हाण यांनी तर प्रस्ताविक प्रा. कमलेश महाजन यांनी केले . संस्थेचे सचिव श्री नितीनजी राठोड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय शिंदे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# १६ लाखांच्या सोयाबीनची चोरी, औसा पोलिसांच्या सतर्कतेमुळे २४ तासांत चोरीचा मुद्देमाल हस्तगत

औसा :– १६ लाखांच्या सोयाबीनची चोरी, औसा पोलिसांच्या सतर्कतेमुळे २४ तासांत चोरीचा मुद्देमाल हस्तगत .

या बाबत अधिक माहिती अशी की, पोलीस ठाणे औसा हद्दीतील एमआयडीसी परिसरातील एका गोडाऊन मध्ये ठेवलेले शेतकऱ्यांचे तब्बत १०० क्विंटल सोयाबीन चोरीला गेले होते. परंतु औसा पोलीस ठाणे पोलिसांच्या सतर्कतेमुळे चोरीला गेलेले पूर्ण सोयाबीन अवघ्या २४ तासात परत मिळाले.

लातूर जिल्ह्यातील औसा पोलीस ठाणे हद्दीत एमआयडीसी मधील गोडाऊन मधील ४ लाख ३९ हजार २०० रुपयांच्या १०० क्विंटल सोयाबीनची चोरी झाली होती. अज्ञात चोरटे २०० कट्टे सोयाबीन दोन वाहना मध्ये टाकून चोरटे पसार झाले होते. याबाबत तक्रार दाखल झाल्यावर पोलीस अधीक्षक सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, (औसा)कुमार चौधरी यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे औसा चे पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांच्या नेतृत्वातील सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे यांच्या पथकाने तत्काळ तपासाची चक्रे फिरवली. सोयाबीन चोरणाऱ्या चोरांबद्दल पोलिसांनी गुप्त माहिती मिळवून २०० कट्टे




सोयाबीन आणि एक आयशर टेम्पो व एक बोलेरो जीप जप्त केले.

नमूद चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी नामे १) अभिषेक सुहास यादव, वय २१, वर्ष राहणार वसवाडी, पाखरसांगवी तालुका जिल्हा लातूर. २) अभय अवधूत भोळे, वय २२ वर्ष, राहणार व वसवाडी, पाखरसांगवी तालुका जिल्हा लातूर. ३) मनोज राजू खताळ, वय २२ वर्ष, राहणार माऊली नगर, पाखरसांगवी तालुका जिल्हा लातूर. ४) हनुमंत भैरवनाथ मुंडे, वय ३९ वर्ष, राहणार टाकळी शिराढोण जिल्हा धाराशिव.

यांना नमूद गुन्ह्यात अटक करण्यात आली असून चोरीस गेलेले सोयाबीन व गुन्ह्यात वापरलेले वाहन जप्त करण्यात आले आहे.

पोलिसांनी चोरी झाल्यापासून अवघ्या चोवीस तासात कारवाई करत चोरीला गेलेलं सोयाबीन शेतकऱ्यांना परत मिळवून दिले. पोलिसांच्या या कामगिरीचे कौतुक होत असून चोरी गेलेल्या सोयाबीनची न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून ते परत केले जाणार आहे. सोयाबीनची चोरी करणाऱ्या टोळक्याला बेड्या ठोकल्या असून २४ तासातच चोरीचा माल हस्तगतकरण्यातऔसापोलिसांनायशआलेआहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे व औसा पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे यांच्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक महावीर जाधव सहायक फौजदार कांबळे पोलिस अमलदार गुट्टे, मुबाज सय्यद तुमकुटे,चामे, पाटील, भंडे ,मगर यांनी केली आहे.

# प्रसिद्ध उद्योजक निलेश ठक्कर यांची मोतीनगर श्री जय मल्हार खंडोबा देवस्थान बांधकामास मदत



लातूर / प्रतिनिधी :– मोती नगर,येथील रहिवासी प्रसिद्ध उद्योजक निलेश (भैय्या) ठक्कर यांनी मंदिर देवस्थान मंडळाच्या आग्रहास्तव मोतीनगर श्री जय मल्हार खंडोबा देवस्थान बांधकाम करून देण्याचे आशवासन दिले व प्रत्यक्षदर्शी बांधकामास सुरूवात झाली आहे. त्यामूळे मोतीनगर श्री जयमल्हार खंडोबा देवस्थान येथील भावीक भक्त व देवस्थान मंडळाच्या वतीने श्री निलेश ठक्कर यांचा सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले.यावेळी खंडोबा देवस्थाचे वारू मंडळाचे अध्यक्ष जयराम बाबूराव सुर्यवंशी,अनिल धुमाळ,गोवींद धुमाळ, अशोक काळे, गणेश हाके, बालाजी काळे, सागर सुर्यवंशी, खंडू कुंजीर, नितीन सुर्यवंशी, पांडूरंग भिसे,ईश्वर घायळ यांनी त्यांचा सत्कार केला.

# पोलीस ठाणे विवेकानंद चौक हद्दीतील खूनाचा उलघडा. खुनातील आरोपीला अटक. पोलीस ठाणे विवेकांनदची कामगिरी.

लातूर :– पोलीस ठाणे विवेकानंद चौक हद्दीतील खूनाचा उलघडा. खुनातील आरोपीला अटक. पोलीस ठाणे विवेकांनदची कामगिरी.

या बाबत माहिती अशी की, ०६ ते ०७ फेब्रुवारी रोजीचे रात्री बाभळगाव नाका ते बसवेश्वर चौकाकडे जाणारे रिंग रोडचे लगत एका हॉटेलचे शटर लगत कोणीतरी अनोळखी इसमांने,अज्ञात कारणासाठी अनोळखी इसमांचे चेहऱ्यावर दगड मारुन जिवे ठार मारलेची घटना घडली होती. त्यावरून पो.स्टे. विवेकानंद चौक, लातूर येथे गुरनं ७८/२०२५ क. १०३ (१) भारतीय न्याय संहिता प्रमाणे दिनांक ०७/०२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक संतोष पाटील करीत आहेत.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधीकारी (लातूर शहर) रणजीत सांवत यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे विवेकानंद चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे नेतृत्वात पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथील पथकाला सखोल मार्गदर्शन व सुचना करून रवाना करण्यात आले होते. दरम्यान सदर पोलीस पथकाने मोठ्या प्रमाणात गोपनिय बातमीदार नेमूण त्यांचेकडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून अनोळखी मयताची ओळख पटवली. सदरचा मयत हा बीड जिल्ह्यातील नेकणूर तालुक्यात राहणारा




नजीर पाशा सय्यद असा असल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन पोलीस पथकांने तपासाची दिशा निश्चीत करून आटोकाट प्रयत्न करत नमुद मयत नजीर पाशा सय्यद याच्या मारेकरीचा शोध घेत होते.


वरिष्ठांच्या मार्गदर्शनात सदर पथकांने दिनांक १४/०२/२०२५ रोजी सतिष भिमराव वाघमारे, वय–३६ वर्ष रा. चाटगाव ता.धारूर जि.बीड ह.मु.विठ्ठल नगर, खणी विभाग,लातूर यास त्याचे राहते घरातून ताब्यात घेऊन चौकशी केली असता सतिष वाघमारे हा मयत नजीर सय्यद याचा मित्र असून काही दिवसापुर्वी त्यांच्यात झालेल्या भांडणाचा राग मनात धरून आरोपी सतीष वाघमारे यांने झोपलेल्या नजीर सय्यद याचे डोक्यावर मोठ्या दगडाने मारून गंभीर जखमी करून खून केल्याचे कबूल केले आहे.

काहीएक उपयुक्त माहिती नसतानाही शास्त्रोक्त पद्धतीने तपास करत पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथील पो.नि.संतोष पाटील यांच्या नेतृत्वाखाली पथकाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनात उत्कृष्ट कामगिरी करत अनोळखी मयताची ओळख पटवली व गुन्ह्यातील आरोपीला जेरबंद केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधीकारी (लातूर शहर) रणजीत सांवत यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे विवेकानंद चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे नेतृत्वात पोलीस ठाणे विवेकानंदचे सपोनि पंकज शिनगारे, वसंत मुळे, पोउपनि अनिल कांबळे, दगडु बुक्तारे, पथकामधील पोलीस अंमलदार खुर्रम काझी, गणेश यादव, यशपाल कांबळे, रवी गोंदकर, राणा देशमुख, संजय बेरळीकर, रमेश नामदास, रामचंद्र गुंडरे, आनंद हल्लाळे, अझहर शेख, इसा शेख, पोलिस उपनिरीक्षक केंद्रे, पोलिस निरीक्षक अशोक अनंत्रे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमीतकुमार पुणेकर, पोलीस अंमलदार धनंजय गुट्टे, शैलेश सुडे, गणेश साठे, अंजली गायकवाड यांनी केलेली आहे.

# दिव्यांगांसाठी ५ टक्के राखीव निधी नगर परिषदेने खर्च करावा

किनवट:शेख शौकत :–किनवट नगर परिषदेच्या एकूण उत्पन्नातून दिव्यांग व्यक्तीसाठी ५ टक्के राखीव असलेला निधी खर्च करण्यात यावा, अशी मागणी करणारे निवेदन दिव्यांग मुव्हमेंट व प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने दि.१४ नगर परिषदेचे मुख्याधिकारी आणि प्रशासक यांना देण्यात आले. निवेदनात नमूद केले आहे की, केंद्र शासनाच्या दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार नगर परिषद कार्यक्षेत्रातील दिव्यांग व्यक्तीसाठी नगर परिषदेच्या एकूण जमा उत्पन्नात ५ टक्के निधी राखीव ठेवणे गरजेचे आहे. मात्र, किनवट नगर परिषदेकडून दिव्यांगासाठी खर्च करण्यात येणाऱ्या निधीत आखडता हात घेतल्याचे दिसून येत आहे. एकूण जमा उत्पन्नाऐवजी अत्यावश्यक खर्च वजा जाता राहिलेल्या रक्कमेतून ५ टक्के निधी खर्च करण्यात येत आहे, हे अत्यंत चुकीचे आहे. नगर परिषदेच्या जमा रक्कमेपैकी ५ टक्के निधी दिव्यांगासाठी उपकरणे पुरविणे, घरकुल योजना, व्यवसाय, मनोरंजन केंद्र, विशेष शाळा, संशोधन केंद्र उभारण्यासाठी तसेच दिव्यांग उद्योजकांच्या उद्योग धंद्याकरीता जागा उपलब्ध करण्यासाठी आवश्यक तो योजना निधी राखुन ठेवण्यासाठी सूचना आहेत. हा राखीव ५ टक्के निधी



दिव्यांगाच्या १९ प्रयोजनार्थ बाबीवर खर्च होणे आवश्यक आहे. निवेदनावर अँड. मिलिंद सर्पे, अध्यक्ष दिव्यांग मुव्हमेंट, नांदेड जिल्हा व भगवान मारपवार, अध्यक्ष प्रहार दिव्यांग क्रांती संघटना, किनवट यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रति सहाय्यक जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, किनवट व तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट यांना देण्यात आल्या आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE